मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मावळ : १५ ग्रामपंचायतींसाठी ७७.८४ टक्के मतदान

## १४ हजार ६९३ जणांनी बजावला मतदानाचा हक्क

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मावळ तालुक्यातील १५ ग्रामपंचायतींसाठी रविवारी (दि. ५) मतदानपार पडले. यामध्ये १४ हजार ६९३ जणांनी मतदानाचा हक्क बजावला. तालुक्यात ७७.८४ टक्के मतदान झाले. मावळ तालुक्यातील १९ ग्रामपंचायतींची निवडणूक जाहीर झाली होती. त्यातील चार ग्रामपंचायतीची निवडणूक बिनविरोध झाली. तर दोन गावांमधील सरपंच पदांची बिनविरोध निवड झाली आहे. तालुक्यात १५ गावांमध्ये ४६ मतदान केंद्रांवर मतदानझाले. १५ गावांमध्ये ९ हजार ३३४ पुरुष मतदार तर ९ हजार ५४० पुरुष मतदार आहेत. दोन तृतीयपंथी मतदारांसह १५ गावांमध्ये १८ हजार ८७६ मतदार आहेत. रविवारी सकाळी साडेसात वाजता मतदानाला सुरुवात झाली.

पहिल्या दोन तासात २४.६० टक्के मतदान झाले. दुपारी साडेतीन वाजेपर्यंत हाती आलेल्या आकडेवारीनुसार सात हजार २९४ महिला आणि सात हजार ३९४ पुरुष मतदारांनी मतदान केले.




एकूण ७७.८४ टक्के मतदान झाले. १५ गावांमधील १५१ जागांसाठी २१७ जणांचे उमेदवारी अर्ज आले. ग्रामपंचायत निवडणुकीसाठी अर्ज भरण्याची मुदत २० ऑक्टोबर पर्यंत होती. त्यानंतर २३ ऑक्टोबर रोजी अर्जांची छाननी झाली. या छाननी मध्ये १३ जणांचा अर्ज बाद झाले. २५ ऑक्टोबर पर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत होती. सरपंच पदाच्या १९ जागांसाठी ११७ उमेदवारी अर्ज आले होते. त्यातील ४९ जणांनी अर्ज माघारी घेतले असून आता १३ गावच्या सरपंच पदासाठी ६८ जण रिंगणात होते.

मावळ तालुक्यात १९ ग्रामपंचायतीपैकी बेबडओहोळ, आढले बुद्रुक, लोहगड आणि ओव्हाळे या चार ग्रामपंचायतींची पूर्ण निवडणूक बिनविरोध झाली. त्यामुळे या गावांमध्ये मतदान प्रक्रिया झाली नाही. तर शिरगाव आणि पुसाणे या गावांमध्ये सरपंच पदाची निवडणूक बिनविरोध झाली असल्याने या दोन गावांमध्ये सदस्य पदांची प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया पार पडली. तालुक्यातील दिवड, मळवंडी ढोरे, भाजे, सांगिसे, कोंडीवडे, उदेवाडी, शिळिंब, मुंढावरे या ग्रामपंचायत निवडणुकीत तिरंगी लढत पहायला मिळाली.

# पीसीसीओई येथे हवामान निरीक्षण केंद्राचा शुभारंभ!

## पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग यांच्या द्वारे या केंद्राची स्थापना

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट द्वारे संचालि पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालय (पीसीसीओई) येथे सौर उर्जे वर चालणारे हवामान, वायू गुणवत्ता निरीक्षण केंद्राचा शुभारंभ करण्यात आला आहे. सिटी युनिव्हर्सिटी ऑफ न्यूयॉर्क आणि पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग यांच्या द्वारे या केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. यूएस कॉन्सुलेट जनरल-मुंबई द्वारे ब्रॉन्क्स समुदायाला प्रदान केलेल्या (झळाअिॅळ)अनुदानाद्वारे हवामान केंद्र उभारण्यात आले आहे. हा प्रकल्प बीसीसी, सीयुएनवाय आणि पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग यांच्यातील सहकार्याने




विकसित करण्यात आला आहे. हा प्रकल्प सिटी युनिव्हर्सिटी ऑफ न्यूयॉर्कचे रसायनशास्त्र विभागप्रमुख, अर्थ आणि एन्व्हायरमेंटल सायन्स प्रा. नील फिलिप्स आणि प्रा. परिमिता सेन यांच्या पुढाकाराने सुरू करण्यात आलेला आहे. पिंपरी हे हवामान केंद्र विस्तृत प्रमाणात हवामान संबंधी डेटा जसे तापमान, आर्द्रता, सौर विकिरण, अतिनील किरण, आर्द्रता आणि हवेची गुणवत्ता गोळा करणार आहे. जमा झालेला डेटा डेव्हीस वेदर लिंक अॅपद्वारे रिअल टाईम मध्ये उपलब्ध होणार असून, त्याचा फायदा हवामान बदलांचा अभ्यास करण्यासाठी उपयुक्त होणार आहे. पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी बदलत्या वातावरणाच्या पार्श्वभूमीवर या हवामान केंद्राचे महत्त्व अधोरेखित केले. पीसीसीओईचे उपसंचालक डॉ. निळकंठ चोपडे , इंटरनॅशनल रिलेशन च्या डीन डॉ. रोशनी राऊत यांनी या प्रकल्पाच्या सहयोगी स्वरूपावर प्रकाश टाकला. या निमित्ताने प्राध्यापकांसाठी कार्यशाळा घेण्यात आली. या मध्ये, पिंपरी चिंचवड युनिव्हर्सिटी मधील प्राध्यापक वर्ग देखील सहभागी झाला होता. या प्राध्यापकांना प्राध्यापक नील फिलिप्स आणि प्राध्यापक परिमिता सेन यांनी मार्गदर्शन केले. पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी सांगितले की, जगापुढे समस्या बनत असलेले वातावरणातील बदल, त्यापुढील उपाय आणि आवश्यक असणारे संशोधन यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

या उपक्रमास पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी शुभेच्छा दिल्या आणि सहभागी प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# दिवाळीच्या तोंडावर खाद्यतेलाच्या दरात मोठी घट

## तेलाच्या दरात ३० ते ३५ टक्क्यांनी घट झाली

**पिंपरी । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** बहुतांश अन्नधान्यांच्या दरात वाढ झालेली असताना खाद्यतेलाच्या दरात मोठी घट झाल्याने गृहिणींना दिलासा मिळाला आहे. गेल्या दिवाळीच्या तुलनेत सूर्यफूल, पाम, सोयाबीन, सरकी तेलाच्या दरात ३० ते ३५ टक्क्यांनी घट झाली आहे. शेंगदाणा तेलाचे दर टिकून आहेत. गेल्या वर्षी दिवाळीत खाद्यतेलांचे दर तेजीत होते. परदेशातून सूर्यफूल, पाम, सोयाबीन तेलाची आवक नियमित



सुरू आहे. खाद्यतेलाची आयात वाढलेली आहे. इस्रायलमधील युद्धजन्य परिस्थिती, तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत खाद्यतेलाला मागणी कमी झाल्याने गेल्या काही महिन्यांपासून खाद्यतेलाच्या दरात टप्प्याटप्प्याने घट झाली. गेल्या वर्षी दिवाळीतील खाद्यतेलाचे दर विचारात घेता यंदा खाद्यतेलांच्या दरात ३० ते ३५ टक्क्यांनी घट झाली आहे. स्वयंपाकाच्या गॅसच्या दरात नुकतीच १०० रुपयांनी वाढ झाली आहे. खाद्यतेले वगळता बहुतांश अन्नधान्याचे दर तेजीत आहेत. खाद्यतेलाच्या दरात घट झाल्याने दिवाळीत गृहिणींना दिलासा मिळाला आहे, असे निरीक्षण मार्केट यार्डातील चिमणलाल गोविंददास पेढीचे भागीदार, खाद्यतेल व्यापारी कन्हैयालाल गुजराती यांनी दिली.

> **“ काही वर्षांपूर्वी दिवाळीत घरोघरी फराळा–चे पदार्थ तयार केले जायचे. गेल्या काही वर्षांपासून गृहिणी बाजारपेठेतून तयार फराळाचे पदार्थ खरेदी करतात. कामाचा व्याप सांभाळून फराळाचे पदार्थ तयार करणे गृहिणींना शक्य होत नाही. त्यामुळे तयार फराळाचे पदार्थ खरेदी करण्याकडे कल वाढला असून, दिवाळीत मिठाई विक्रेते, फराळ तयार करणाऱ्यांकडून खाद्यतेलांना मागणी वाढते. घरगुती ग्राहकांकडून खाद्यतेलांना असलेल्या मागणीत घट होत चालली आहे.**
>
> **– कन्हैयालाल गुजराती,**
> **खाद्यतेल व्यापारी, मार्केट यार्ड.**

# खिळे आणि धाग्यांनी विणून बनवली आमदार शेळके यांची प्रतिमा!

## राहुल ठाकरे याने साकारली कलाकृती

**मावळ। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** आपल्या प्रिय नेत्याविषयीच्या भावनांना व्यक्त करायच्या भन्नाट संकल्पना त्याच्या चाहत्या कार्यकर्त्यांच्या मनातील एक छंद असतो. त्यात जर चाहता कलाकार असेल तर तो त्याच्या कलेचा कस लावून एखादी हटके कलाकृती साकारण्याचा जीवापाड प्रयत्न करतो. अशीच एक कलाकृती साकारली आहे ती आशिया व इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड होल्डर राहुल ठाकरे या तरुण स्ट्रिंग आर्टिस्टने! करंजगाव (मावळ) येथील विश्वकर्मा पांचाळ समाज ट्रस्ट यांच्या सहकार्यातून मावळचे आमदार सुनिल शेळके यांची



नेल्स थ्रेडिंग पोस्टर अर्थात खिळे-धागे विणकाम केलेली प्रतिमा आहे.या चाहत्यांनी रविवारी (ता.५) तळेगाव दाभाडे येथील आमदारांच्या जनसंपर्क कार्यालयात ही कलाकृती आमदार शेळके यांना भेट म्हणून सुपूर्द केली. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष किरण लोहेकर, कलाकृतीकार राहुल ठाकरे, दिलीप सुतार, उमेश तंबोरे, प्रदीप तंबोरे, गणेश गाडे, गणेश सुतार, विश्व सुतार, गणेश तंबोरे, सोनल आनंदे, संतोष आनंदे, नामदेव गराडे, शिवप्रसाद सुतार, चिमणराव तंबोरे, सहादु तंबोरे, बाळासाहेब तंबोरे, बबनराव तंबोरे, बाळासाहेब सुतार, नाथा तंबोरे, दत्ता तंबोरे, बाळासाहेब गरुड, दशरथ सुतार आदि.उपस्थित होते.आमदार सुनिल शेळके यांचा वाढदिवस नुकताच झाला, मात्र त्या दिवशी आपल्या लाडक्या आमदाराच्या उपस्थितीत कोणताही कार्यक्रम नसल्याने या चाहत्यांनी रविवारचा मुहूर्त साधून आमदारांप्रती त्यांच्या असलेल्या भावनेतून ही अनोखी कलाकृती भेट दिली. यावेळी या अप्रतिम भेटीविषयी कृतज्ञता व्यक्त करताना आमदार शेळके म्हणाले,आपल्या माणसांकडून मिळणाऱ्या शुभेच्छा आणि आशीर्वाद हे नेहमीच ऊर्जा देत असतात. लोकप्रतिनिधी म्हणून जनतेसाठी असलेल्या कर्तव्याची जाणीवही सतत करुन देतात.विश्वकर्मा पांचाळ समाज ट्रस्ट करंजगावच्या माझ्या मावळ्यांनी राहुल सारख्या कलाकाराला प्रोत्साहन देत तयार केलेल्या या पोस्टर मधील प्रत्येक खिळा आणि त्यात गुंफलेल्या धाग्यांसारखे आपले हे नाते अतूट राहील.

# आरक्षण देण्याची इच्छाशक्ती आहे का?

## तारखांचा घोळ करून फसवणूक : सुप्रिया सुळे

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मराठा समाजाला सरसकट आरक्षण देण्यासंदर्भात मनोर जरांगे पाटील यांनी दोन महिन्यांची मुदत देत मोठेपणा दाखविला आहे. राज्यातील तिघाडी सरकार मात्र तारखांचा घोळ करण्यात व्यस्त आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्याची इच्छाशक्ती या तिघाडी सरकारमध्ये आहे का, हा खरा प्रश्न आहे, असा सवाल बारामती लोकसभा मतदारसंघाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केला. उपमुख्यमंत्री अजित पवार डेंग्यूने आजारी होते. आरोग्याच्या बाबतीत राजकारण करू नये. त्यांच्या तब्येतीची चौकशी करत आहे, असे सांगत त्यांनी अजित पवार यांचा आजार राजकीय नव्हता, हे स्पष्ट केले.




चांदणी चैकातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आला आहे. उड्डाणपूल उभारण्यात आल्यानंतरही या भागातील समस्या कायम राहिल्या आहेत. या पार्श्वभूमीवर सुप्रिया सुळे यांनी चांदणी चैकाला भेट देत चर्चा केली. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. माजी नगरसेवक सचिन दोडके आणि काका चव्हाण यावेळी उपस्थित होते. चांदणी चौकातील संपूर्ण प्रकल्पाची श्वेतपत्रिका काढण्याची मागणीही सुळे यांनी केली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मुख्यमंत्री झालेले पाहायला आवडेल, अशी प्रतिक्रिया त्यांच्या आईंनी दिली आहे. यासंदर्भात बोलताना कोणत्या आईला तसे वाटणार नाही, असे सुळे यांनी सांगितले. सुळे म्हणाल्या की, पाच महिन्यांपूर्वी कांदा प्रश्न पेटणार असल्याचे सांगितले होते. वाणिज्य मंत्री पियुष गोएल यांनी त्याची दखल घेतली नाही. कांद्यावर चाळीस टक्क्यांचा कर चुकीच्या पद्धतीने लावण्यात आला आहे. केंद्रातील आणि राज्यातील सरकार शेतकरी आणि महिला विरोधी आहे. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला सरसकट आरक्षण देण्याची भूमिका घेतली आहे. त्यासासाठी त्यांनी मोठेपणा देत सरकारला दोन महिन्यांचा कालावधी दिला आहे. राज्यातील सरकार मात्र तारखांचा घोळ करून फसवणूक करत आहे. आरक्षण देण्याची इच्छाशक्ती सरकारमध्ये आहे का, हा मूळ प्रश्न आहे. इच्छाशक्ती असेल तर ते आरक्षण देतील, असे सुळे यांनी स्पष्ट केले.

### सरकार शेतकरी विरोधी

» चांदणी चौकातील संपूर्ण प्रकल्पाची श्वेतपत्रिका काढण्याची मागणीही सुळे यांनी केली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मुख्यमंत्री झालेले पाहायला आवडेल, अशी प्रतिक्रिया त्यांच्या आईंनी दिली आहे. यासंदर्भात बोलताना कोणत्या आईला तसे वाटणार नाही, असे सुळे यांनी सांगितले. सुळे म्हणाल्या की, पाच महिन्यांपूर्वी कांदा प्रश्न पेटणार असल्याचे सांगितले होते. वाणिज्य मंत्री पियुष गोएल यांनी त्याची दखल घेतली नाही. कांद्यावर चाळीस टक्क्यांचा कर चुकीच्या पद्धतीने लावण्यात आला आहे. केंद्रातील आणि राज्यातील सरकार शेतकरी आणि महिला विरोधी आहे.

# कचरा डेपोप्रश्नी उपमुख्यमंत्री अजित पवारांकडे पाठपुरावा करू : काटे

## पुनावळेतील नागरिकांनी घेतली काटे यांची भेट

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पुनावळे येथील प्रस्तावित कचरा डेपो स्थलांतरित करण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पाठपुरावा करणार असल्याचे आश्वासन माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांनी नागरिकांना दिले आहे. आयटी परिसरालगत असलेला पुनावळे, मारुंजी, जांभे, नेरे, विनोदेवस्ती या परिसरातील अनेक सोसायटी धारक नियोजित कचरा डेपो विरोधात रस्त्यावर उतरून पुनावळे कचरा डेपो रद्द करण्यासाठी निदर्शने केली. बाईक रॅली आयोजित करण्यात आली होती. त्यानंतर नागरिकांनी काटे यांची भेट घेऊन उपमुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करण्याची विनंती केली. या वेळी काटे यांनी हे आश्वासन दिले..



काटे यांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात नमूद केले की, प्रशासनाने येथील जागा ताब्यात घेण्यासाठी वन विभागाला चंद्रपूर येथे जमीन विकत घेऊन देण्याची प्रक्रिया देखील सुरू आहे. मोशीतील कचरा डेपोची क्षमता संपुष्टात येत असल्याने पुनावळे येथे लवकरात लवकर कचरा डेपो उभारण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे. नागरिकांचा विरोध पाहता पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे कचरा डेपो विरोधात निवेदने देऊन स्थलांतरित करण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे काटे म्हणाले. महापालिकेने २००८ मध्ये पुनावळे येथे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प मंजूर केला आहे. त्यावेळी पुनावळे भागात नागरीकरण झालेले नव्हते. मात्र, १५ वर्षात या भागात मोठे नागरीकरण झाले असून पुनावळे परिसरातील लोकसंख्या एक लाख पेक्षा अधिक झाली आहे. इथले नैसर्गिक वातावरण, बाजूला असलेले आयटी पार्क आणि पुनावळे येथे आरोग्य, शिक्षण, गृह प्रकल्प या सुविधांमुळे नागरिक इथे राहण्याला पसंती देत आहेत. २००८ पासून प्रस्तावित असलेल्या कचरा डेपोला स्थानिक सोसायटीधारक विरोध करत आहेत.

> “ पुनावळे भागात अनेक आयटी कर्मचारी वास्तव्यास आले आहेत. या कचरा डेपोच्या सभोवताली मोठ्या प्रमाणात टोलेजंग इमारती उभ्या राहिल्या आहेत. मध्यभागी होणारा पुनावळे कचरा डेपो मानवी जीवनाचा विचार करता शहराच्या अन्य भागात स्थलांतरित करावा, अशी मागणी पालकमंत्री अजित पवार यांच्याकडे करणार आहे.
>
> **- नाना काटे,** माजी विरोधी पक्षनेता, पिंपरी-चिंचवड महापालिका.

# वाढत्या प्रदूषणामुळे आरोग्याला धोका!

## राज्य सरकारकडून खबरदारीच्या उपाययोजनांना सुरुवात



**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

राज्यभरात अनेक शहरांमध्ये प्रदूषणाची पातळी वाढली आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. काही ठिकाणी हवा गुणवत्ता निर्देशांक (एक्यूआय) दोनशेपर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे राज्याच्या आरोग्य विभागाने आता पावले उचलली आहेत. हवा प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका पोहोचू नये, यासाठी उपाययोजना करण्यास सुरुवात करण्यात आली आहे.हिवाळ्यामुळे वातावरणातील प्रदूषित वायू आणि धुलिकण हे हवेतच राहिल्याने हवेची गुणवत्ता खराब होते. त्यामुळे मानवी आरोग्यावर घातक परिणाम होऊ शकतात. या महिन्यात राज्यात विविध शहरांची हवेची गुणवत्ता खराब झालेली असून, हवा गुणवत्ता निर्देशांक दोनशेच्या पुढे गेल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे सर्व जिल्हे आणि महापालिकांच्या प्रशासनाला आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि जनजागृती करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत, अशी माहिती आरोग्य सेवा विभागाचे सहसंचालक डॉ. प्रतापसिंह सारणीकर यांनी दिली. राज्यातील १७ शहरांमध्ये वायुप्रदूषणामुळे होणाऱ्या तीव्र आजारांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. प्रत्येक शहरातील रुग्णालयांच्या आपत्कालीन विभागामध्ये तीव्र श्वसनासंबंधी आजारांचे सर्वेक्षण करण्यात येईल. शहरांसाठी नोंदविलेली दैनंदिन एक्यूआय पातळी आणि श्वसनाच्या आजारांचे रुग्ण यांची माहिती संकलित केली जाईल. वायुप्रदूषणाशी संबंधित आजार आणि रुग्णांच्या मृत्यूची आकडेवारी नोंदविली जाणार आहे. एक्यूआय पातळी आणि हॉट स्पॉट ओळखून तिथे आवश्यक आरोग्य सेवा पुरवण्यात येतील, असे सारणीकर यांनी स्पष्ट केले.

### मानवी आरोग्यावर घातक परिणाम होऊ शकतात

» हवा प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका पोहोचू नये, यासाठी उपाययोजना करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. हिवाळ्यामुळे वातावरणातील प्रदूषित वायू आणि धुलिकण हे हवेतच राहिल्याने हवेची गुणवत्ता खराब होते. त्यामुळे मानवी आरोग्यावर घातक परिणाम होऊ शकतात. या महिन्यात राज्यात विविध शहरांची हवेची गुणवत्ता खराब झालेली असून, हवा गुणवत्ता निर्देशांक दोनशेच्या पुढे गेल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे सर्व जिल्हे आणि महापालिकांच्या प्रशासनाला आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि जनजागृती करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत, अशी माहिती आरोग्य सेवा विभागाचे सहसंचालक डॉ. प्रतापसिंह सारणीकर यांनी दिली.

# पुणे महापालिकेच्या दहा हजार कंत्राटी कामगारांची दिवाळी गोड!

## दहा हजार कंत्राटी कामगारांना दिवाळी बोनस जाहीर




**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

महापालिकेच्या विविध विभागाकडील दहा हजार कंत्राटी कामगारांना दिवाळी बोनस जाहीर करण्यात आला आहे. कंत्राटी कामगारांना बोनस मिळावा, या मागणीसाठी राष्ट्रीज मजदूर संघटनेकडून उपोषण सुरू करण्यात आल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. ठेकेदारांकडून हा बोनस दिला जाणार आहे. महापालिकेतील कंत्राटी कामगार अधिनियम १९७१ नुसार दिवाळी बोनस द्यावा लागतो. मात्र तो दिला जात नसल्याने राष्ट्रीय मजदूर संघटनेचे अध्यक्ष सुनील शिंदे यांच्या नेतृत्वाखाली उपोषण सुरू करण्यात आले होते. आंदोलनाच्या पहिल्या दिवशी कामगार विभागाचे अतिरिक्त कामगार आयुक्त शैलेंद्र पोळ यांनी दूरध्वनीद्वारे सुनील शिंदे यांच्याशी संपर्क साधला होता. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ. कुणाल खेमनार आणि उपायुक्त माधव जगताप तसेच मुख्य कामगार अधिकारी नितीन केंजळे यांच्या सोबत बैठक झाली होती. कंत्राटी कामगारांना बोनस देण्यासंदर्भात कामगार उपायुक्तांनी पत्र दिले होते. त्यानंतर कंत्राटी कामगारांना ठेकेदारांनी बोनस देण्याबाबतचे परिपत्रक महापालिका प्रशासनाकडून काढण्यात आले. ठेकेदाराकडून बोनस देण्यास विलंब झाल्यास महापालिका प्रशासन ठेकेदाराऐवजी बोनस देईल आणि ही रक्कम त्यांच्या देयकातून वळती करून घेतली जाणार आहे. त्यामुळे दहा हजार कंत्राटी कामगारांची दिवाळी गोड होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# राज्यातील उच्च शिक्षण सहसंचालकांच्या बदल्या

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागातर्फे विभागीय उच्च शिक्षण सहसंचालकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. काही सहसंचालकांचा कार्यभार संपुष्टात आणण्यात आला असून, पुणे विभागाच्या सहसंचालकपदी डॉ. केशव तुपे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

उच्च शिक्षण सहसंचालकांच्या बदल्यांची चर्चा गेल्या काही दिवसांपासून होती. या पार्श्वभूमीवर उच्च व तंत्रशिक्षण विभागाने या संदर्भातील शासन निर्णय प्रसिद्ध केला. पुणे विभागाचे सहसंचालक किरणकुमार बोंदर यांची बदली नांदेड विभागीय सहसंचालक पदी करण्यात आली आहे. तर पुणे विभागीय उच्च शिक्षण सहसंचालकपदी मुंबई विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. केशव तुपे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सोलापूर विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. उमेश काकडे यांची बदली अमरावती विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक पदी, अमरावतीच्या विभागीय सहसंचालक डॉ. नलिनी टेंभेकर यांची सोलापूर विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक पदी नियुक्ती करण्यात आली आहे. जळगाव येथील विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. संतोष चव्हाण यांना नागपूर विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक पदाची, नागपूर विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक डॉ .संजय ठाकरे यांच्याकडे जळगाव सहसंचालक पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. मुंबई येथील एलफिस्टन महाविद्यालयाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. संजय जगताप यांच्याकडे कोकण विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार दिला गेला आहे.